# गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यायलयीन शिक्षकांचा राजकीय सहभाग

**भगवान व्ही. धोटे,** संशोधनकर्ता, जयगुरू नगर मु.पो.आष्टी ता.चामोर्शी जि. गडचिरोली पिन कोड ४४२७०७

प्रस्तावना: सहभाग ही एक क्रियाशील असण्याची स्थिती आहे. यालाच आपण सामाजिक प्रक्रिया सुध्दा म्हणू शकतो. सकाळी फिरायला जाणाऱ्या व्यक्तीला क्रियाशील म्हणता येत नाही पण तोच व्यक्ती १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत सहभागी होत असेल तर तो क्रियाशील आहे एखाद्याच्या शेजारी कोणीतरी व्यक्ती खुप दिवसांपासून राहत आहे, परंतू त्याला त्या व्यक्तीविषयी काहीच माहिती नाही. म्हणजेच तो व्यक्ती सहभाग घेण्याच्या वृत्तीचा नाही. तर मग राजकीय सहभाग काय आहे ? १९५० च्या शतकानंतर यावर खुप व्यापक विचार विनिमय करण्यात आले. विद्वानांमध्ये याची गरज व आवश्यकतेवर जणूकाही करारच करण्यात आले. राजकीय सहभाग हा वेगवेगळ्या स्तरावर व्यक्ती, संस्था किंवा गटांच्या माध्यमातून होत असल्याचे दिसते. यादृष्टीने समाजाचा एक महत्वाचा घटक असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा राजकीय सहभाग आहे काय ? हे जाणून घेणे आवश्यक आहे. कारण शिक्षक हा समाजाचा पाया आहे. समाज घडविण्याची महत्वपूर्ण जबाबदारी ही शिक्षकाची आहे. मग या समाजाचे सुत्र संचालन करणाऱ्या राजकीय व्यवस्थेमध्ये शिक्षकाचे योगदान काय आहे ? हे गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा राजकीय सहभागाचे अध्ययन केल्यावर समजते.

राजकीय सहभाग हा विविध स्वरूपाचा आहे. व्यक्ती यामध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भाग घेत असतो. यामध्ये स्थानिक किंवा राष्ट्रीय निवडणूकीत मतदान, जनमत संग्रहात मतदान, निवडणूक प्रचार किंवा इतर प्रकारचे निवडणूक अभियान राबविणे, कोणत्याही राजकीय पक्षाची सक्रीय सदस्यता, सरकारच्या परामर्शदायी समित्यांची सदस्यता, सार्वजनिक उद्योगांच्या उपभोक्ता परिषदेची सदस्यता, सामाजिक नियोजनाच्या कार्यान्वयांमध्ये ग्राहकांचा सहभाग, विविध प्रकारच्या सार्वजनिक कार्यकलापामध्ये सहभाग, राजकीय उद्देशाने राजकीय मोर्चे, औद्योगिक उपोषण, सार्वजनिक वस्त्यांच्या किरायासंबंधीत उपोषण तसेच सार्वजनिक व्यवस्था बदलण्याच्या उद्देशाने चालवल्या जाणाऱ्या कार्यकलापामध्ये भाग घेणे हे राजकीय सहभागाचे रूप आहेत. कितीतरी स्तरांवर तसेच विविध रूपांच्या माध्यमातून व्यक्ती आपली राजकीय सहभागिता दर्शवू शकतो.

**शिक्षकांच्या राजकीय सहभागाचे विश्लेषण**

गडचिरोली जिल्ह्याचे अध्ययन केल्यानंतर तेथील महाविद्यालयीन शिक्षकांचे राजकीय सहभागाचे विविध पैलू उलगडता येतात. गडचिरोली जिल्हा हा अतिशय दुर्गम आणि आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यामध्ये १२ तालुके आहेत. २००१ च्या जनगणनेनुसार या जिल्ह्याच्या साक्षरतेचे प्रमाण ६०.१ टक्के आहे. गडचिरोली जिल्हा हा शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत असून सदर जिल्ह्यात १३७५ प्राथमिक शाळा, २६६ माध्यमिक विद्यालये व ७७ वरिष्ठ महाविद्यालये आहेत. प्रस्तूत संशोधनामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील ७७ वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या राजकीय सहभागाचे अध्ययन करण्यात आले आहे. या महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या शिक्षकांची एकूण संख्या ३८५ इतकी आहे. त्यापैकी १५० शिक्षकांची निवड अध्ययनाचा नमूना म्हणून करण्यात आली. या १५० शिक्षकांची राजकीय सहभागीता सन २०१७ च्या सर्वेनुसार मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून पडताळण्यात आली.

**मतदानातील सहभाग**

सर्वच राजकीय विकासाच्या आणि नुतनीकरणाच्या वाङमयावरून हे स्पष्ट होते की राजकीय सहभाग आणि नवीनिकरण ही एक सर्वसाधारण प्रक्रिया आहे जी मतदानाच्या मोजणीवरून आणि त्यांच्या निर्णयावरून ठरत असते.[१] मतदानाचा अधिकार हा लोकशाही शासनव्यवस्थेचा आत्मा आहे. आपल्या देशात प्रौढ मताधिकाराचे तत्व स्विकारले आहे आणि संविधानाच्या कलम ३२६ नुसार सर्व प्रौढ स्त्री व पुरूषांना मतदानाचा अधिकार दिला गेला आहे. मतदान हे राजकीय सहभागाचे महत्वपूर्ण रूप आहे. गडचिरोली जिल्ह्यातील ७७ वरिष्ठ महाविद्यालयांमधून १५० शिक्षकापैकी ८० टक्के शिक्षक हे नियमित मतदान करतात. तर २० टक्के शिक्षक हे नियमित मतदान करीत नाही. यावरून असे लक्षात येते की, महाविद्यालयीन शिक्षक हे मतदानात मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

**जाहीर सभांना उपस्थिती**

''राजकीय पक्षांच्या जाहीर सभांना उपस्थित राहणे हा राजकीय सहभागाचा एक महत्वपूर्ण व सक्रिय मार्ग मानला जातो. मिलब्राथने या मार्गाचा समावेश सक्रिय मार्गाच्या यादीत केला आहे.''[२] निवडणूकीच्या काळामध्ये कोणताही राजकीय पक्ष हा आपल्या प्रचार व प्रसारासाठी विविध सभांचे आयोजन करीत असते. जाहीर सभा म्हणजे संवादाचे साधन ठरतात. निवडणूक काळात प्रत्येक पक्ष आपली भूमिका व उमेदवार यांचा प्रचार सर्व घरांतील मतदारात व्हावा म्हणून जाहीर सभांचा मार्ग पत्करतात.[३] या प्रचार सभांना उपस्थित राहणारी व्यक्ती पक्षाची सभासद असतेच असे नाही. जिल्ह्यातील १५० शिक्षकापैकी २० टक्के शिक्षक सर्व सभांना उपस्थित राहतात. ५० टक्के शिक्षक एखाद्या वेळी उपस्थित राहतात तर ३० टक्के शिक्षक हे राजकीय पक्षाच्या सभांना उपस्थित राहत नाही. या टक्केवारी वरून शिक्षकांची राजकीय सहभागीता ही सर्व साधारण आहे.

**मोर्चा/निदर्शने यातील सहभाग**

स्वातंत्र्यपूर्व काळात बहिष्कार व हरताळ हे प्रकार अस्तित्वात होते, पण आता रास्ता रोको, रेल रोको, बंद या सारख्या तंत्राचा उपयोग होतांना दिसतो. निरनिराळ्या वेळी या तंत्राचा उपयोग करणाऱ्यांच्या मते त्याचे परिणाम केवळ दृश्य व परिणामकारक असतात असे नाही, तर शासनाचे लक्ष विशिष्ट समस्येकडे आकृष्ट करण्यास हे तंत्र उपयोगी पडते.[४] त्यामुळे मोर्चे आणि निदर्शने हे राजकीय सहभागाचे महत्वपूर्ण रूप आहे. गडचिरोलीतील शिक्षकांमध्ये याचे प्रमाण असे सांगता येईल की ४ टक्के शिक्षक हे सर्व सभांना उपस्थित राहतात, ३७ टक्के शिक्षक अधुनमधून उपस्थिती दर्शवितात तर ५९ टक्के शिक्षक हे कोणत्याच सभांना उपस्थित राहत नाही.

**संघटनांचे सभासदत्व :**

सामाजिक संस्था ह्या नागरीक आणि शासन यांच्यामध्ये मध्यस्थांची भूमिका बजावित असतात. कधीकधी नागरीकांच्या मागण्यांचे आदान शासनाकडे अशा सामाजिक संघटनांच्या माध्यमातून होत असते, म्हणून सामाजिक संघटनेचे सभासदत्व हा राजकीय सहभागाचा एक मार्ग किंवा उपक्रम ठरतो.

सामाजिक संघटनेची सदस्य असलेली व्यक्ती ही राजकीय दृष्ट्या सुध्दा क्रियाशील असतात. बहुदा या संघटनेचे सभासदत्व ऐच्छिक असते.[५] स्वयंप्रेरणेने ह्या संघटनांचे सभासदत्व स्विकारणे हे व्यक्तीचा राजकीय सहभाग दर्शवित असते. अशा संघटनांचे सदस्यत्व असणाऱ्या महाविद्यालयातील शिक्षकांचे प्रमाण संबंधित सर्वेवरून असे सांगता येईल की, सामाजिक संघटनांचे सदस्यत्व असणाऱ्या शिक्षकांची टक्केवारी ही ४५ टक्के आहे, तर ५५ टक्के सभासद हे कोणत्याही संघटनेचे सभासद नाही.

त्याचप्रमाणे पक्षाचा प्रचार करणे ही सुध्दा राजकीय सहभागाची एक प्रक्रीया आहे. वर्मा व नरेन यांनी त्यांच्या लेख संकलित स्वरूपाच्या थ्वतजी ळमदमतंस म्समबजपवद पद प्दकपं या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे, 'प्रतिमा निर्मिती व प्रतिमा हणन' करण्याचे कार्य प्रचार मोहिम पार पाडतात. निवडणूकी प्रक्रीयेत उतरलेला प्रत्येक उमेदवार व प्रत्यक्ष पक्ष स्वतःच्या प्रतिमेस उजाळा देण्याचा व आपल्या स्पर्धकाची प्रतिभा नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असतो.[६] गडचिरोली जिल्ह्यातील १८ टक्के महाविद्यालयीन शिक्षक हे निवडणूकीत प्रत्यक्ष प्रचार करतात तर ८२ टक्के शिक्षक हे प्रचारात सहभागी होत नाही. तसेच राजकीय पक्षाचे सदसत्य असणाऱ्या शिक्षकांची टक्केवारी ही २४ टक्के आहे तर ७६ टक्के शिक्षक हे कोणत्याही पक्षाचे सदस्य नाही.

त्याचप्रमाणे पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या शिक्षकांची टक्केवारी ही ३ः आहे. तर ९७ टक्के शिक्षक हे निवडणूक लढवित नाही. पक्षामध्ये विशिष्ट पदावर असणाऱ्यांची टक्केवारी ०३ टक्के आहे, तर ९७ टक्के शिक्षक हे पदावर नाहीत.

उपरोक्त सर्वेनुसार मिळालेल्या आकडेवारीनुसार गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांचा राजकीय सहभाग किती प्रमाणात आहे हे लक्षात येते, राजकीय सहभाग ही समाजाशी निगडीत अशी प्रक्रिया आहे.

**निष्कर्ष :-**

राजकीय सहभाग हा व्यक्तीचा क्रियाकलाप आहे. यामध्ये समाजाचा घटक म्हणून शिक्षकांची भूमिका ही महत्वाची ठरते. त्या संदर्भात गडचिरोली जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा २०१७ चा जो सर्वे घेण्यात आला त्यामध्ये महाविद्यालयीन शिक्षकांचा राजकीय सहभाग समाधानकारक असल्याचे दिसत नाही. मतदानामध्ये शिक्षकांचा सहभाग खुप जास्त असला तरी सभांमध्ये उपस्थित राहण्याचे प्रमाण हे सर्वसाधारण आहे. त्याचबरोबर मोर्चे काढणे, प्रचार करणे, राजकीय पक्षाचे सदस्यत्व, निवडणूक लढविणे, तसेच राजकीय पदाचा विचार केला तर शिक्षकांचा यामध्ये सहभाग खुपच कमि असल्याचे दिसून येते एकंदरीत राजकीय सहभागाचे विश्लेषण करायचे झाल्यास असे म्हणता येईल की वरिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा गडचिरोली जिल्ह्यामध्ये राजकीय सहभाग हा कमी आहे महाविद्यालयीन शिक्षक हे राजकीय क्रियाकलापामध्ये मोठया प्रमाणात सहभागी असल्याचे दिसत नाही.

**संदर्भ सूची :-**


1. Milbrath, L. W. & God, M. L. Political Participation 2nd ed. (Chicago : Rand me Nelley college publishing co.1977) P.22
2. Milbrath, L. W. & Goal, M. L. Ibid P. 110
3. Sirsikar V. M. Political Behaviour in India (Bombay : P. C. Manakfulla and Son Pvt. Ltd. 1965), P. 8
4. सिरसीकर, व्ही. एम. आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण ;पूणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन २००१द्ध पृ. ३११
5. Milbrath, op. cit P. 110
6. इनामदार, एन. आर. व पूराणिक, सु. वा. राजकीय समाजशास्त्र ;पूणे : कॉन्टिनेन्टल प्रकाशन १९८४द्ध पृ. ११३